ePaper

# हे बंडखोर नव्हते, गद्दारच होते -आदित्य ठाकरे



वर्ष - 6 । अंक - 106 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- आतुरता गणरायाच्या आगमनाची..!
- खासदार बारणे खुद्दार, 'हॅट्रीक' हक्कदार !
- राज्यात पुरामुळे २८ जिल्हे प्रभावित


www. mahaenews. | । गुरुवार । दिनांक 21 जुलै 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews




पूर ओसरल्यानंतर जलजन्य आजारांचा फैलाव वाढू नये म्हणून स्थानिक आरोग्य यंत्रणांनी तात्काळ खबरदारी घ्यावी. नद्यांची पात्रे गाळ साचल्यामुळे उथळ झाली आहेत. पात्रांचे खोलीकरण व रुंदीकरण केल्याने नद्यांचे प्रवाह पूर्ववत होण्यासाठी मदत होईल यासाठी जलसंपदा विभागाने नदया तसेच धरणे यातील गाळ काढण्याबाबत योग्य ती कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात.

-एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री

हा तिढा अवघड होता. पण तो सोडवण्यासाठी आम्ही त्यावेळेस विरोधी पक्ष, संघटना या सर्वांशी वारंवार चर्चा करून त्यांनाही विश्वासात घेतले होते. जयंत बांठिया यांच्यासारखा अनुभवी वरिष्ठ अधिकारी आणि त्यांच्या टीमने हे शिवधनुष्य पेलले, त्याबद्दल त्यांनाही जितके धन्यवाद द्यावे तितके कमीच आहेत. यामध्ये आयोगाचे सर्व सदस्य तर अतिशय मेहनतीने काम करत होतेच. शिवाय राज्याच्या प्रशासकीय यंत्रणेतील सर्व घटकांनी देखील सर्वतोपरी प्रयत्न केले.

-उद्धव ठाकरे, शिवसेना



# नाहक 'वसुली' नको !

## आमदार लक्ष्मण जगताप यांचा सज्जड इशारा : उद्यानांमध्ये शूल्क आकारणी रद्द करा

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज ।

**एकीकडे प्रशिक्षणाच्या नावाखाली अधिकारी व कर्मचाऱ्यांना लोणावळ्यात घेऊन जाऊन हॉटेलमध्ये पिंपरी-चिंचवडकरांच्या लाखो रुपयांची उधळपट्टी करता आणि दुसरीकडे शहरातील उद्यानांमध्ये विरंगुळ्यासाठी येणाऱ्या नागरिक व बालगोपाळांना शुल्क आकारता. आयुक्त साहेब, हा असा उधळपट्टीचा आणि निधी गोळा करण्याचा कारभार बिलकूल चालणार नाही.**





महापालिकेच्या सर्व उद्यानासाठी प्रवेश शुल्क लागू करण्याचा उद्यान विभागाचा प्रस्ताव तत्काळ रद्द करा. अन्यथा ही जनता तुम्हाला माफ करणार नाही, असा सज्जड इशारा आमदार लक्ष्मण जगताप यांनी महापालिका आयुक्त राजेश पाटील यांना दिला आहे.

यासंदर्भात आमदार लक्ष्मण जगताप यांनी महापालिका आयुक्त राजेश पाटील यांना निवेदन दिले आहे, "पिंपरी-चिंचवडमध्ये विविध ठिकाणी महापालिकेचे एकूण १९५ सार्वजनिक उद्याने आहेत. शहरातील करदात्या नागरिकांनी मोकळा श्वास घ्यावा, आयुष्यातील काही क्षण विरंगुळा म्हणून जगता यावेत यासाठी हे उद्यान विकसित करण्यात आलेले आहे. तसेच पर्यावरण संतुलनाचे कामही या उद्यानांमार्फत केले जाते. या उद्यानांमध्ये शहरातील जेष्ठ नागरिक, महिला व बालगोपाळ गर्दी करतात. विरंगुळ्यासाठी उभारण्यात आलेल्या या उद्यानात प्रवेशासाठी शुल्क आकारण्याचा प्रस्ताव प्रशासनाने तयार केला आहे.उद्यानात येणाऱ्या नागरिकांकडून २० रुपये, तर बालकांकडून १० रुपये प्रवेश शुल्क महापालिका प्रशासनाकडून आकारले जाणार आहे. शहरात गरज नसतानाही अनेक लहान विकासकामांसाठी नेमलेल्या कन्सल्टंट यांच्यावरील अनावश्यक खर्च कमी करून तो उद्यानाच्या देखभाल दुरूस्तीसाठी वापरण्यात यावा. उद्यानात येणाऱ्या नागरिकांकडून कोणतेही शुल्क आकारण्यात येऊ नये.

### प्रशासनाची मानसिकता चुकीची...

शहरात महापालिकेच्या अनेक मोठ्या मिळकती, सभागृहे आहेत. तरी देखील स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापनाच्या नावाखाली अधिकारी व कर्मचाऱ्यांची लोणावळा येथे एक दिवस प्रशिक्षण देण्यात आले. हॉटेलमध्ये झालेल्या या प्रशिक्षणावर पिंपरी-चिंचवडकरांनी भरलेल्या पैशांतून प्रशासनाने लाखो रुपये उधळले आणि दुसरीकडे उद्यानात येणाऱ्या नागरिकांकडून शुल्क वसूल करण्याचा प्रस्ताव म्हणजे महापालिका प्रशासनाची उधळपट्टी आणि नागरिकांकडून वसुलीची मानसिकता दिसून येते. आयुक्त साहेब, ही मानसिकता शहराच्या विकासाची किंवा हिताची नाही. असला कारभार बिलकूल खपवून घेतला जाणार नाही. प्रशासनाच्या कारभाराबाबत पिंपरी-चिंचवडकरांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण होत आहे. अशा कारभाराला प्रशासनाने वेळीच आवर घालावा.

# यांत्रिकी पद्धतीने रस्ते सफाईला अखेर मंजुरी

## प्रशासनाचा मोठा निर्णय : सात वर्षांसाठी 328 कोटी रुपयांची निविदा

। पिंपरी । महाईन्यूज ।

पिंपरी-चिंचवड शहरातील १८ मीटरपेक्षा अधिक रुंदीचे मोठे रस्ते आणि मंडई व इतर मोकळ्या जागा यांत्रिकी पध्दतीने साफसफाई करण्याच्या कामाची निविदा अखेर महापालिका प्रशासनाने प्रसिद्ध केली आहे. सात वर्षांसाठी ३२८ कोटी रुपयांची ही निविदा आहे.



चार पॅकेजमध्ये निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे. दरम्यान, तत्कालीन सत्ताधारी भाजपने नऊ महिने हा विषय प्रलंबित ठेवला होता. प्रशासकांनी पहिल्याच बैठकीत हा विषय मंजूर केला होता.

"यांत्रिकी पद्धतीने रस्ते सफाईची निविदा प्रसिद्ध केली आहे. चार पॅकेजमध्ये ही निविदा आहे. सात वर्षासाठी 328 कोटी रुपयांची निविदा आहे. 17 ऑगस्टपर्यंत निविदा स्वीकारली जाणार आहे"

- डॉ. अनिल राय, आरोग्य वैद्यकीय अधिकारी.



महापालिकेमार्फत शहरातील रस्ते यांत्रिकी पद्धतीने साफसफाईचे कामकाज करण्यात येते. निविदा प्रक्रीयेद्वारे डी.एम.एंटरप्रायजेस आणि बी.व्ही.जी. इंडिया या दोन संस्थांना 1 डिसेंबर 2015 ते 30 नोव्हेंबर 2017 या दोन वर्षे कालावधीसाठी कामकाज सोपविण्यात आले होते. हा कालावधी संपुष्टात आल्यानंतर या संस्थांना मुदतवाढ देण्यात आली. ही मुदतवाढ 31 डिसेंबर 2018 रोजी संपुष्टात आल्यामुळे पुन्हा चार महिने कालावधीकरीता त्यां ना मुदतवाढ देण्यात आली. त्यानंतर सन 2020 मध्ये शहरातील रस्त्यांची यांत्रिकी पद्धतीने साफसफाई करण्याच्या कामकाजासाठी पॅकेज निहाय दर मागविण्यात आले होते.

**शॉर्ट न्यूज »**

## विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या बसला आग



**। पुणे । महाईन्यूज ।**

विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या बसला अचानक आग लागल्याची घटना कात्रज-कोंढवा रस्त्यावर घडली. बसमध्ये विद्यार्थी नसल्याने अनर्थ टळला कात्रज-कोंढवा रस्त्यावर सुंदरबन सोसायटीजवळ शालेय विद्यार्थी वाहतूक करणारी बस लावण्यात आली होती. बुधवारी सकाळी नऊच्या सुमारास बसमधून अचानक धूर येऊ लागला. काही क्षणात बसने पेट घेतला. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन आग आटोक्यात आणली. बसमध्ये विद्यार्थी नसल्याने अनर्थ टळला, अशी माहिती अग्निशमन दलाकडून देण्यात आली.

# आतुरता गणरायाच्या आगमनाची..!

## पुण्यात बाप्पाच्या मुर्त्यांची बुकिंग सुरु"

**। पुणे। महाईन्यूज ।**



गेली दोन वर्ष कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सर्वच सणउत्सव निर्बंधात साजरे करावे लागले. पण यंदाच्या वर्षी निर्बंध मुक्त झाल्यानं सर्वच धर्मीय सणउत्सव हे मोठ्या उत्साहाने साजरे करत आहेत. पुढच्या महिन्यात सर्वत्र गणेशोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केला जाणार आहे. कारण दोन वर्ष कोरोनाच्या पार्श्वभूमीवर निर्बंधात गणेशोत्सव साजरा करावा लागला होता. त्यामुळे दोन महिन्यांआधीच शहरात वातावरण तयार झालं आहे.

गणेशोस्तवासाठी लागणाऱ्या मुर्त्यांचं काम हे अंतिम टप्प्यात आलं आहे. पण यंदा महागाईचा फटका हा मुर्त्यांवर बसला असून १० टक्के वाढ ही मुर्त्यांच्या किंमतीत झाली आहे. गेली दोन वर्ष कोरोनाच्या पार्श्वभूमीवर निर्बंधात गणेशोत्सव साजरा केला गेला. पण यंदा निर्बंध मुक्त झाल्याने शहरात गणेशोत्सव मंडळ तसेच नागरिक गणेशोत्सवाच्या तयारीला लागले आहे. गणेशोत्सवासाठी बाप्पाच्या मूर्तीचे काम देखील अंतिम टप्प्यात आले आहे. दोन वर्षे ५० टक्क्यांपेक्षा कमी मूर्ती विकल्या गेल्याने आर्थिक संकटात असलेल्या मुर्तीकारांना यंदा मात्र अच्छे दिन येणार असल्याचे चित्र दिसत आहे. महागाईचा मूर्ती विक्रीवर देखील फटकागेल्या काही महिन्यांपासून जीवनावश्यक वस्तू तसेच पेट्रोल, डिझेल आणि घरगुती गॅसमध्ये वाढ होताना पाहायला मिळत आहे. वाढत्या महागाईमुळे मूर्तीसाठी लागणारे साहित्य देखील महाग झाल्याने यंदा मुर्त्यांच्या किंमतीमध्ये दहा टक्के एवढी वाढ झाली आहे. तसेच यंदाच्या गणेशोत्सवामध्ये पीओपीच्या मुर्त्यांचा प्रमाण हे अधिक असल्याचं यावेळी मूर्ती विक्रेते श्रीकांत शिंदे यांनी सांगितलंय. यंदाही पुणे शहरात मानाचे गणपती, दगडूशेठ, विठ्ठलाच्या मूर्तीचा क्रेझ डिसेंबर महिन्यापासूनच मूर्तिकार हे बाप्पाची मूर्ती बनवण्यासाठी तयारीला लागतात.

पण मागील दोन वर्ष कोरोनामुळे बाप्पाच्या मूर्ती हे कमी प्रमाणात विक्रीला गेल्याने ५० टक्के मुर्त्या शिल्लक होत्या. तर काही नवीन मुर्त्या देखील यंदाच्या वर्षी बनविण्यात आल्या आहेत. यंदाच्या वर्षी देखील पुणे शहरात मानाच्या बाप्पाच्या मूर्त्या तसेच दगडूशेठ गणपतीची प्रतिकृती आणि विशेष करून विठ्ठलाच्या मूर्तीचा क्रेझ असून नागरिक आतापासूनच मूर्तीसाठी बुकिंग करत आहेत.",

# 'जीएसटी'मुळे खाद्यपदार्थांची दरवाढ अटळ!

## सामान्यांच्या खिशाला कात्री; उपाहारगृह व्यावसायिकांचा नफा घटणार

**पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।**



अन्नधान्यांसह जीवनावश्यक वस्तूंवर पाच टक्के जीएसटी लावण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयामुळे उपाहारगृहे, रुग्णालये, महाविद्यालयांची कॅन्टीन आणि खाणावळीत मिळणाऱ्या खाद्यपदार्थांसह अन्नप्रक्रिया उद्योगातून तयार झालेले फरसाण, चिवडा, भडंग आदी वेष्टनांकित खाद्यपदार्थांची दरवाढ अटळ आहे. व्यावसायिक स्पर्धेमुळे आजची दरवाढ उद्यावर जाणार, इतकीच तूर्तास दिलासादायक बाब आहे

उपाहारगृह व्यावसायिक किशोर सरपोतदार आणि गणेश शेट्टी यांनी दिलेल्या माहितीनुसार उपाहारगृह व्यावसायिकांना खाद्यपदार्थ तयार करण्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालावर घटकनिहाय पाच, बारा आणि अठरा टक्के, असा जीएसटी भरावा लागतो. त्यामुळे खाद्यपदार्थ तयार करण्याचा खर्च वाढतो. यापूर्वी उपाहारगृहातील खाद्यपदार्थांना अठरा टक्के जीएसटी होता, त्या वेळी कर परतावा मिळत होता. आता उपाहारगृहातील खाद्यपदार्थांवर पाच टक्के जीएसटी आकारला जात असल्यामुळे कोणताही कर परतावा मिळणार नाही. त्याशिवाय बहुतेक उपाहारगृहे भाड्याच्या जागेत असतात. या भाड्यावर अठरा टक्के जीएसटी भरावा लागतो. मात्र, या सर्व प्रकारच्या जीएसटीचा कोणताही कर परतावा मिळत नाही. याचा परिणाम म्हणून खाद्यपदार्थांच्या दरात वाढ करून हा सर्व जीएसटी अंतिमतः ग्राहकांकडूनच वसूल केला जातो. त्यामुळे खाद्यपदार्थांची दरवाढ अटळ आहे.

> **अन्नधान्य, जीवनावश्यक वस्तूंवरील पाच टक्के जीएसटीचा थेट फटका सामान्य ग्राहकांना बसणार आहे. उपाहारगृह व्यावसायिकांना थेट फटका बसणार नाही. खाद्यपदार्थांचे दर वाढवून ते ग्राहकांकडून कर रक्कम वसूल करतात. उलट दरवाढ करण्याची संधी त्यांना मिळते. कोणत्याही कराची रक्कम अंतिमतः ग्राहकांच्या खिशातूनच वसूल केली जाते.**
>
> **-चारुदत्त भिडे, कर सल्लागार**

### चिवडा, फरसाणा व्यावसायिकांना दिलासा

लक्ष्मीनारायण चिवड्याचे प्रशांत डाटा म्हणाले, की शेतमालावर आम्हाला पाच टक्के जीएसटी द्यावा लागला तरी तयार खाद्यपदार्थांच्या विक्रीवर बारा टक्के जीएसटी घेतला जातो. त्यातून कच्च्या मालावर दिलेल्या जीएसटीचा कर परतावा मिळतो. त्यामुळे सध्या दरवाढ होणार नाही. पण, २५ किलोंच्या वरील वेष्टनांकित कच्चा माल घेण्याचे नियोजन करावे लागेल. या पूर्वी करचोरी करण्यासाठी उत्पादनाच्या लेबल शिवाय खरेदी-विक्री केली जायची. त्याला आळा बसून, कर संकलन वाढेल.

### कॅन्टीनमध्ये तूर्त दरवाढ नाही

रुग्णालये, महाविद्यालयांच्या कॅन्टीनमध्ये तूर्तास दरवाढ होणार नाही. या सर्व कॅन्टीनचे करार एका वर्षाचे असतात. त्यात दरनिश्चिती केलेली असते. त्यामुळे अधेमध्ये खाद्यपदार्थांच्या दरात वाढ करता येत नाही. पण, नव्याने करार होताना त्यात दरवाढीचा विचार होईलच. त्यामुळे कॅन्टीनमध्ये तूर्तास दरवाढ होणार नाही. ग्राहक टिकून राहण्यासाठी खाद्यपदार्थांच्या दर्जात तडजोड करता येत नाही आणि स्पर्धेमुळे दरवाढही करता नाही, अशा अवस्थेत व्यावसायिकांना आपला नफा कमी करून व्यवसायात टिकून राहावे लागते. पण सरतेशेवटी दरवाढ करावीच लागते.

# खासदार बारणे ‘खुद्दार’; ‘हॅटट्रीक’चे हक्कदार!

## बारणेंच्या भूमिकेमुळे पिंपरी-चिंचवड शिवसेनेत फूट

पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

शिवसेना प्रमुख बाळसाहेब ठाकरेंच्या विचारांशी ‘गद्दारी’न करता हिदुत्त्वाच्या मुद्यावर भाजपाशी युती करावी. ज्या शिवसेना प्रमुखांनी आयुष्यभर काँग्रेस- राष्ट्रवादीविरोधात संघर्ष केला. त्यांसोबतची महाविकास आघाडी तोडावी, अशी मागणी करीत शिवसेनेतील ४० आमदार आणि १२ खासदारांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्त्वाखाली नव्या आणि स्वाभीमानी शिवसेनाचा प्रयोग केला. राज्यातील राजकीय भूकंपाचे हादरे आता पिंपरी- चिंचवडपर्यंत येवून पोहोचले. शहरातील शिवसेनेचे खासदार श्रीरंग बारणे यांनी अखेर शिंदे गटात सहभागी होत बाळासाहेबांच्या विचारांशी ‘खुद्दार’अर्थात प्रामाणिक असल्याचे जाहीर केले. मावळ लोकसभेचे खासदार श्रीरंग बारणे यांनी शिवसेनेला अखेर रामराम ठोकला. आगामी राजकीय वाटचाल





सक्षम होत असतानाच भाजपाच्या मदतीने पुन्हा मावळातून २०२४ मध्ये हॅटट्रीक साधण्याचा मार्ग सोपा केला आहे. दरम्यान, शहर शिवसेनेत आता फूट पडली असून, बारणे गट शिवसेनेतून बाहेर पडण्याच्या तयारीत आहे.

मावळ लोकसभा मतदार संघातून २०१४ ला माजी खासदार गजानन बाबर यांना डावलून शिवसेनेतून बारणे यांना उमेदवारी दिली होती. तसेच, २०१९ ला देखील पक्षाने त्यांना तिकीट देऊन त्यांच्यामागे ताकद उभी केल्याने त्यांना खासदारकीची दुसरी टर्म गाजवता आली. लोकसभा निवडणूक भाजपा- शिवसेना युतीद्वारे लढवण्यात आली. चिंचवडचे भाजपा आमदार लक्ष्मण जगताप यांनी राजकीय वैर बाजूला ठेवून पक्षादेशानुसार बारणे यांना सहकार्य करण्याची भूमिका ठेवली. परिणमी, पिंपरी-चिंचवडमधून बारणेंना मोठे मताधिक्य मिळाले. या मताधिक्याच्या जोरात बारणे यांनी पवार कुटुंबातील पार्थ पवार यांचा मोठ्या फरकाने पराभव केला.

### संसदपटू बारणे शहराला न्याय देतील...

सलग दोनदा संसदेत पिंपरी-चिंचवडचे नेतृत्त्व करणारे खासदार श्रीरंग बारणे संसदरत्न पुरस्काराने सम्मानित आहेत. केंद्र सरकारशी संबंधित विविध प्रश्नांना न्याय देण्यासाठी खासदार बारणे आता पुढाकार घेतील, अशी अपेक्षाही यानिमित्ताने व्यक्त केली जात आहे.

### बारणेंनी अचूक टायमिंग साधले...

दरम्यान, राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनाप्रमुख उद्धव ठाकरे यांना महाविकास आघाडी सरकारमधील मुख्यमंत्री पदावर विराजमान होण्याची संधी मिळाली. अजित पवार हे उपमुख्यमंत्री राहिले. शरद पवार आणि अजित पवार यांच्या शब्दासाठी मावळ मतदार संघ पार्थ पवार यांच्यासाठी सोडावा लागण्याचे संकेत खासदार बारणे यांना मिळाले आहेत. आता आगामी लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीतून तिकीट कापले गेल्यास, राजकीय वाटचाल संकटात येणार, अशी स्थिती असल्यामुळे बारणेंनी अचूक ‘टायमिंग’ साधले. आगामी निवडणुका या शिवसेना (शिंदे गट) आणि भाजपा एकत्रित लढणार हे निश्चित आहे. त्यामुळे मावळातून बारणेंची उमेदवारी पक्की झाली असून, तिसऱ्यांदा संसदेत जाण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

### शहर शिवसेनेत दोन गट...

पिंपरी-चिंचवडमध्ये खासदार बारणे यांचा काही कार्यकर्त्यांचा एक गट सक्रिय आहे. बारणे यांचे पुतणे माजी नगरसेवक निलेश बारणे, माजी आमदार एड. गौतम चाबुकस्वार, आकुर्डीतील माजी नगरसेवक प्रमोद कुटे, वाकड भागातील माजी नगरसेविका रेखा दर्शिले, महिला संघटिका उर्मिला काळभोर, माजी शहरप्रमुख योगेश बाबर हे बारणे याचे कट्टर कार्यकर्ते आहेत. तसेच, शिरुरचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनीही शिंदे गटात सहभागी होण्याचा निर्णय घेतल्यामुळे भोसरी विधानसभा मतदार संघातील एक मोठा गट शिवसेनेतून बाहेर पडण्याच्या तयारीत आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवडमधील शिवसेनेत मोठी फूट पडली असून, त्याचा फायदा थेट भाजपाला होणार आहे.

### शॉर्ट न्यूज »

### वनाझ ते शिवाजीनगर मेट्रो लवकरच ट्रॅकवर!

पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी ।

वनाझ ते शिवाजीनगर धान्य गोदाम (सिव्हिल कोर्ट) या पुणे मेट्रोच्या रिच २ मार्गातील व्हायाडक्टचे काम पूर्ण झाले आहे. या मार्गिकेवरील डेक्कन, छत्रपती संभाजी महाराज उद्यान, पुणे महापालिका आणि सिव्हिल कोर्ट या स्थानकांची कामे गतीने पूर्ण करण्यात येत आहेत.त्यामुळे लवकरच वनाज ते सिव्हिल कोर्टपर्यंतचा मेट्रो प्रवास सुरू होईल, असा विश्वास महामेट्रोचे संचालक डॉ. ब्रिजेश दीक्षित यांनी व्यक्त केला.वनाज ते सिव्हिल कोर्टदरम्यानचे पिलर यापूर्वीच उभे राहिले असून, रेल्वे रूळ टाकण्यासाठीच्या सेग्मेंट व व्हायाडक्टचे कामही पूर्ण झाले आहे. या मार्गिकेवर आता विद्युतीकरणाची कामे हाती घेण्यात आली आहेत. या कामांची पाहणी नुकतेच डॉ. ब्रिजेश दीक्षित यांनी केली. या स्थानकांसोबतच अन्य कामेही

---

## भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांची प्रतिक्रिया

# ओबीसी आरक्षण : फडणवीसांनी दिला शब्द केला खरा !

## सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे केले स्वागत

। पिंपरी-चिंचवड।
महाईन्यूज । प्रतिनिधी।






**सर्वोच्च न्यायालयाने ओबीसी आरक्षणासह निवडणुका घेण्याचे आदेश दिले आहेत. “आमच्या विचारांचे सरकार राज्यात आल्यावर तीन महिन्यांत ओबीसी आरक्षण देणार...” असा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेला शब्द अखेर खरा ठरला आहे. ओबीसी राजकीय आरक्षणासाठी प्रयत्न करणाऱ्या सर्वांचे आभार मानतो, अशी प्रतिक्रिया भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांनी दिली.**

राज्यातील ओबीसी समाजाला राजकीय आरक्षणाचा मार्ग मोकळा झाला आहे. सर्वोच्च न्यायालयाने ओबीसी आरक्षणासह निवडणुका घेण्याचे आदेश दिले आहेत. “आमच्या विचारांचे सरकार राज्यात आल्यावर तीन महिन्यांत ओबीसी आरक्षण देणार...” असा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेला शब्द अखेर खरा ठरला आहे. ओबीसी राजकीय आरक्षणासाठी प्रयत्न करणाऱ्या सर्वांचे आभार मानतो, अशी प्रतिक्रिया भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांनी दिली.

ओबीसी राजकीय आरक्षणाबाबत सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी महत्त्वपूर्ण निकाल दिला. राज्य सरकारने नेमलेल्या बांठिया आयोगाच्या शिफारसी स्वीकारून सर्वोच्च न्यायालयाने आज स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये २७ टक्के ओबीसी आरक्षणाचा मार्ग मोकळा केला आहे. या निर्णयाचे आमदार लांडगे यांनी स्वागत केले. आमदार लांडगे म्हणाले की, ओबीसी राजकीय आरक्षणाबाबत महायुतीच्या सरकारने दिलेला शब्द पाळला आहे. बांठिया आयोगाने सादर केलेल्या अहवालासह ट्रिपल टेस्ट व अन्य बाबी सर्वोच्च न्यायालयाने स्वीकारल्या असून, ओबीसींच्या २७ टक्के पर्यंत मर्यादितील आरक्षणासह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका २ आठवड्यात जाहीर कराव्यात, असा आदेशही दिला आहे.

ओबीसी आरक्षणाच्या शिवाय निवडणुका नको... अशी भूमिका राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली होती. आज या निकालामुळे इच्छाशक्ती असेल, तर कोणताही प्रश्न कसा सोडवता येतो? याचा आदर्श महायुती सरकारने घालून दिला आहे. या निर्णयाचे आम्ही स्वागत करतो. तसेच, मुख्यमंत्री शिंदे व उपमुख्यमंत्री फडणवीस यांचे अभिनंदन आणि आभारही मानतो, असेही आमदार लांडगे यांनी म्हटले आहे.

## संपादकीय »

# वरून कीर्तन; आतून तमाशा...

***भ्रष्टाचार हा भारतीय मानसिकतेत मोठा आकर्षक विषय. त्यात हा कथित भ्रष्टाचाराचा मुद्दा राजकीय व्यक्तींबाबत असेल तर भारतीयांच्या कल्पनाशक्तीस बहर येतो.***

या संदर्भात अशी काही आकडेवारी फेकली जाते की आरोप करणाऱ्यांच्या आणि ते गोड मानून विश्वास ठेवणाऱ्यांच्या बौद्धिक अजागळपणाने डोळे दिपतात. बरे हे आरोप पुढे सिद्ध होऊन संबंधितांस शासन होतेच म्हणावे तर तसेही नाही. पण भ्रष्टाचाराचे आरोप एकमेकांवर करणे आणि ते सोयीस्करपणे खरे-खोटे मानून त्यानुसार तितक्याच सोयीस्करपणे भूमिका घेणे हे आपले वैशिष्ट्य. या भ्रष्टाचाराच्या आरोपांचा पुढे छडा का लागत नाही, हा प्रश्न आपणास पडेपर्यंत नव्या कोणा भ्रष्टाचार आरोपांत नैतिक भारतीय रममाण झालेले असतात. त्यामुळे बोफोर्स, टू जी दूरसंचार, व्यापम् आदी एकापेक्षा एक भारी भ्रष्टाचार प्रकरणांची फक्त चर्चा भारतीय मन लावून करतात. पण यातील एकही प्रकरण ना धसास लागले, ना त्याबाबत काही कोणी कारवाई केली. भ्रष्टाचार आरोपांच्या या देदीप्यमान मालिकेत आता आणखी एका प्रकरणाची भर पडते की काय, हा प्रश्न पडावा अशा घटना घडताना दिसतात.

हे प्रकरण आहे माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या काळात घडलेला देवास- अँट्रिक्स करार. ते सरकार सत्तेवर आल्यानंतर एका वर्षांत- २००५ साली- इस्रोची व्यावसायिक उपकंपनी अँट्रिक्स आणि २००४ साली बेंगळूरु येथे स्थापन झालेल्या 'देवास मल्टिमीडिया' कंपनीत करार झाला. त्यानुसार अँट्रिक्सने दोन उपग्रह बांधून अवकाशात प्रक्षेपित करणे अपेक्षित होते आणि त्या उपग्रहांच्या दळणवळण क्षमतेतील ९० टक्के कंपनलहरी देवासला उपलब्ध करून दिल्या जाणार होत्या. त्यांचा वापर देशांतर्गत उपग्रह प्रक्षेपणासाठी होणार होता. सुमारे हजार कोटी रुपयांच्या या कंत्राटाची वाटचाल पहिली सहा वर्षे व्यवस्थित सुरू होती. तथापि २०११ साली फेब्रुवारी महिन्यात मनमोहन सिंग सरकारने हा करार रद्द केला. यात दळणवळणासाठी वापरली जाणारी कंपनसेवा सुरक्षा यंत्रणांसाठी राखीव ठेवण्याचा निर्णय झाल्याने अन्य व्यावसायिक सेवांसाठी ती उपलब्ध करता येणार नाही, असे कारण दिले गेले आणि हा करार एकतर्फी रद्द झाला. हा काळ 'टू जी' दूरसंचार घोटाळा ऐन भरात असण्याचा. अण्णा हजारेंपासून बाबा रामदेवांपर्यंत चेकाळलेल्या समाजात नवा मेणबत्ती संप्रदाय उदयास आला तोही याच सुमारास. या वातावरणात देवास-अँट्रिक्स प्रकरण दूरसंचारशी जोडले गेले आणि यात तब्बल दोन लाख कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याचा आरोप केला गेला. ही दोन लाख कोटी रुपयांची रक्कम कोठून आली, कशी हाताळली जाणार होती, याचा कोणताही तपशील दिला गेला नाही.



## आनंदी सकाळ

# गुरुतत्त्व परावाणीच्या अतीत...

भागवत धर्माचे आधारस्तंभ असलेल्या नाथांच्या घराण्यात दत्तभक्ती होती. श्रीजनार्दन स्वामींनी एकनाथांच्या बालवयातच, प्रामाणिक सेवाभावावर प्रसन्न होऊन, दत्तात्रेयांचे तीन शिरे, सहा हात असे सगुण दर्शन घडविले. दत्तात्रेयांच्या सगुण रूपाकडे पाहून, या संप्रदायाला सगुण म्हणावे, की त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्ताला निर्गुण म्हणावे? सत्व-रज-तम, उत्पत्ती-स्थिती-लय याला कारक असलेल्या ब्रह्मा, विष्णू, महेश या तिन्ही देवता दत्तावतारात एकरूप आहेत. या तीन देवता कार्यरूपाने सगुण आहेत व आश्चर्य असे, की दत्तरूपात हे त्रिगुण एकत्रित आहेत. ती त्रिगुणांची साम्यावस्था आहे, म्हणजे, जगताचे अस्तित्व नसलेली गुणातीत स्थिती. असा हा सगुण-निर्गुणाचा एकाच वेळी, एकाच रूपात दर्शन घडविणारा, स्मर्तुगामी दत्त सगुण-निर्गुणाचे मोठे विलक्षण रूप आहे. संत एकनाथ म्हणतात, 'नेति नेति शब्द न ये अनुमाना।' कार्य व कारण या शब्दांनीही दत्तात्रेयांचे अनुमान करता येत नाही.

# तेरे मेरे बीच में, कैसा है यह बंधन अंजाना...






सत्तांतरा नंतर राज्यात नव्याने आलेल्या शिंदे-फडणवीस अर्थात मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री जोडीची टिंगलटवाळी जखमी शिवसेना नेते संजय राऊतांनी सुरू केली. खरं तर अजुन मंत्रीमंडळ अस्तित्वात नाही.

1981 साली कमल हासन, रितु अग्निहोत्री यांचा एक दुजे के लिए चित्रपट आला होता. त्यात तेरे-मेरे बीच में, कैसा है यह बंधन अंजाना, मैने नही जाना, तुने नही जाना हे गाणं गाजलं होतं. अर्थात लव स्टोरी चित्रपट कथा असली तरी महाराष्ट्राच्या वर्तमान राजकिय चित्रपटात या गाण्याची आठवण शिवसेना नेते संजय राऊताला झाली. त्यांनी म्हटलं मंत्रीमंडळ विस्तार झालेला नाही. राज्यात एक दुजे के लिए प्रमाणे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री काम करतात. खरं तर क्षमतावान दोन माणसं एकत्रित आल्यानंतर त्या दोघात गठीत झालेलं बंधन ज्याची ओळख एकमेकांनासुद्धा नसते तर संजय राऊत कोण कुठले? खरं तर त्यांनी भातुकलीच्या खेळामधली राजा आणि राणी, अर्ध्यावरती डाव मोडीला अधुरी एक कहाणी हे गाणं गुणगुणत बसण्याची गरजय.

सत्तांतरा नंतर राज्यात नव्याने आलेल्या शिंदे-फडणवीस अर्थात मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री जोडीची टिंगलटवाळी जखमी शिवसेना नेते संजय राऊतांनी सुरू केली. खरं तर अजुन मंत्रीमंडळ अस्तित्वात नाही. उद्या परवा विस्तार होईल. तथापि राज्यकारभार नव्या सरकारचा सुरू झाला असुन जनहिताच्या निर्णयाला प्राधान्य देताना अनेक विकासकामाचा सपाटा लावला. काही महत्वाचे निर्णय घेत असताना अतिवृष्टीचे जे संकट सद्या डोळ्यासमोर सरकारच्या आहे त्याला तोंड देण्यासाठी प्रशासन सज्ज ठेवुन शिंदे-फडणवीसांनी कडवी नजर संकटावर ठेवली. पेट्रोल-डिझेलचे दर कमी केले.

शेतकऱ्यांना बाजार समितीच्या निवडणुकीत मतदानाचा अधिकार दिला. एवढंच नाही छत्रपती संभाजी नगर, धाराशिव, दि.बा.पाटील विमानतळ यासारखे निर्णय पुनश्च घेतले. कारण कायद्याच्या चौकटीत बसुन हे निर्णय ठाकरे सरकारने शेवटच्या क्षणी घेतले नव्हते.

# भाषिक स्वैराचाराच्या संस्कृतीची विसंगती...

**'लोकसभा व राज्यसभेत प्रत्येक सभासदाला पूर्ण अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे. कोणत्याही शब्दांवर बंदी घातलेली नाही.**

एकीकडे भाषा व संस्कृती मंडळ स्थापन करायचे, संस्कृतीबद्दल बोलायचे; पण स्वतः निवडून आल्यावर असभ्य, असंस्कृत बोलायचे आणि अनियंत्रित वागायचे यातून नेत्यांमध्ये दिसणारा नागरिकशास्त्र जगण्याचा अभाव जनतेने ओळखला पाहिजे आणि अशा लोकांना पुन्हा निवडून द्यायचे नाही, असे ठरवले पाहिजे.

एकीकडे भाषा व संस्कृती मंडळ स्थापन करायचे, संस्कृतीबद्दल बोलायचे; पण स्वतः निवडून आल्यावर असभ्य, असंस्कृत बोलायचे आणि अनियंत्रित वागायचे यातून नेत्यांमध्ये दिसणारा नागरिकशास्त्र जगण्याचा अभाव जनतेने ओळखला पाहिजे आणि अशा लोकांना पुन्हा निवडून द्यायचे नाही, असे ठरवले पाहिजे.

'लोकसभा व राज्यसभेत प्रत्येक सभासदाला पूर्ण अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे. कोणत्याही शब्दांवर बंदी घातलेली नाही. केवळ संसदीय कामकाजातून २०२०मध्ये असंसदीय



ठरवून काढलेल्या शब्दांची यादी सचिवालयाने प्रसिद्ध केली आहे,' असे स्पष्टीकरण लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांना द्यावे लागले; कारण संसदीय कामकाजातून अनेक शब्द काळ्या यादीत समाविष्ट केल्याची माहिती संसदेच्या सचिवालयाने नुकतीच जारी केल्याच्या बातम्या सर्वत्र प्रकाशित झाल्या व त्यावर गदारोळ झाला. सरकारवर टीका करण्याचा अधिकारच काढून घेण्याची ही नवीन पद्धत आहे, असा आरोप केला गेला. काही शब्द 'असंसदीय' ठरवून, संसदेत अनेक शब्दांच्या वापरावर बंदी का आणावी लागते, हा प्रश्न यातून निर्माण झाला. संसदेतील सदस्यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर बंधने आणता येऊ शकतात का, हा प्रश्नही विचारात घेतला पाहिजे.

परस्परांना समजून घेणे व त्यासाठी भावना व्यक्त करण्यास वाव मिळणे, यातूनच संवाद होतो. 'हितार्थ बोलणे नित्य कुणाला न खुपेल असे' या पद्धतीने जबाबदारीचे भान ठेवून आपले म्हणणे मांडणे शक्य असते; पण अनेकांना तसा प्रयत्न करण्याचा धीर नसतो. चर्चा प्रश्न सोडविण्यासाठी असते, एकमेकांवर प्रश्न फेकून मारण्यास चर्चा म्हणता येत नाही. दर वेळी एखादी राजकीय लढाई जिंकावी, आपण जे बोलत आहोत त्यातून बातमी व्हावी, असा उद्देश ठेवून बोलल्याने चर्चा घडत नाही. संसदेत योग्य व समर्पक उत्तर देण्याची जबाबदारी सत्ताधारी पक्षावर असते. दर वेळी प्रश्नकर्त्याची टर उडवणे योग्य नाही. संसद ही समस्यांवर उपाय शोधण्याची जागा आहे, याचे भान अनेक लोकप्रतिनिधींना राहत नाही.

## ।। अभंगवाणी ।।



जन विजन जालें आम्हां ।
विठ्ठलनामा प्रमाणें ॥१॥
पाहें तिकडे बापमाय ।
विठ्ठल आहे रखुमाई ॥धृ.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

**कराड : अंधश्रद्धेतून गुप्तधनापोटीच करपेवाडीतील युवतीचा बळी;**

। सांगली । महाईन्यूज ।

पाटण तालुक्यातील करपेवाडीमध्ये गेल्या साडेतीन वर्षापूर्वी भाग्यश्री संतोष माने या महाविद्यालयीन युवतीचा गळा चिरून झालेला खून हा अंधश्रद्धेचा बळी असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार अंधश्रद्धेतून गुप्तधनाच्या अमिषापोटी निष्पाप भाग्यश्रीचा नरबळी तिच्या आजीकडूनच दिला गेल्याची दुर्दैवी घटना २२ जानेवारी २०१९ रोजी घडली होती. पोलिसांनी या गुन्ह्यात दोघा मांत्रिकासह चौघांना अटक केली असून, त्यांना आज बुधवारी घटनास्थळी आणण्यात आले होते. विकास राठोड (वय ३५) व फुलसिंग राठोड (वय ४८, दोघेही रा. कर्नाटक) तसेच रंजना साळुंखे (वय ५८, रा. करपेवाडी, ता. पाटण), कमल महापुरे (वय ५०, रा. खळे, ता. पाटण) अशी पोलिसांनी या प्रकरणी हातकड्या ठोकलेल्यांची नावे आहेत. या गुन्ह्यात आणखी काहींचा समावेश असल्याचे उघड होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. अलीकडेच सांगली जिल्ह्यात एकाच कुटुंबातील ९ जणांचा अंधश्रद्धेतून बळी गेल्याची धक्कादायक बाब उघड झाली

# ओबीसींना राजकीय आरक्षण!

## बांठिया आयोगाचा अहवाल सर्वोच्च न्यायालयाने स्वीकारला, ट्रिपल टेस्टची अटही पूर्ण

। नवी दिल्ली । महाईन्यूज ।

स्थानिक स्वराज्य संस्थांमधील इतर मागासवर्गाचे राजकीय आरक्षण पुनर्स्थापित करण्यासाठी नेमलेल्या बांठिया आयोगाचा अहवाल सर्वोच्च न्यायालयाने स्वीकारल्याने राज्यातील स्थानिक निवडणुकांचा मार्ग आता मोकळा झाला आहे. निवडणुकीची प्रक्रिया दोन आठवड्यांत सुरू करण्याचे आदेश न्यायालयाने दिल्याने आता २७ टक्के राजकीय आरक्षण ओबीसींना मिळणार आहे. राज्य निवडणूक आयोगाला सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या प्रत मिळालेली नाही. मात्र न्यायालयाचा आदेश मिळताच त्याचा अभ्यास करून पुढील कार्यवाही सुरू केली जाईल, अशी माहिती आयोगाच्या सूत्रांनी बुधवारी दिली.



धुळे, नंदुरबारसह नागपूर, वाशिम, अकोला, भंडारा आणि गोंदिया या जिल्हा परिषदांसाठी झालेल्या निवडणुकीतील नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) जागांवरील निवडणुका रद्द करून तेथे नव्याने निवडणुका घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्याचे गेल्या वर्षी मे महिन्यात समोर आले होते. तेव्हापासून राज्यात ओबीसी आरक्षणाचा पेच तयार झाला होता. हा पेच सोडविण्यासाठी तसेच तिहेरी चाचणीचा निकष पूर्ण करून इम्पेरिकल डेटा तयार करण्यासाठी बांठिया आयोग गठीत केला होता. या आयोगाचा अहवाल सर्वोच्च न्यायालयाने मान्य केल्याने गेल्या काही महिन्यांपासून लांबणीवर पडलेल्या महापालिका, जिल्हा परिषद, नगर पालिका, नगर पंचायतींच्या निवडणुका आता होऊ शकतील.

ओबीसी आरक्षणाशिवाय निवडणुका नकोत, अशी सर्वच राजकीय पक्षांची भूमिका होती. त्यामुळे निवडणूक आयोगाने जेव्हा जेव्हा स्थानिक निवडणुका जाहीर केल्या तेव्हा तेव्हा निवडणुका पुढे ढकलण्याची मागणी होत होती. शिवाय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशामुळे राज्य निवडणूक आयोगाने ९२ नगरपालिका आणि ४ नगर पंचायतींच्या निवडणुका स्थगित केल्या होत्या. आता न्यायालयाच्या निर्णयामुळे स्थानिक निवडणुका ओबीसी आरक्षणासह होणार असून त्यासाठी आयोगाला नव्याने आरक्षण सोडतीची प्रक्रिया राबवावी लागणार आहे.

### महाविकास आघाडीचा विजय-छगन भुजबळ

राज्यातील ओबीसींसाठी आजचा दिवस आनंदाचा असून हा महाविकास आघाडीचा विजय असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी स्पष्ट केले आहे. ओबीसींचे राजकीय आरक्षण धोक्यात आल्यानंतर राज्यात हे आरक्षण पूर्ववत होण्यासाठी महाविकास आघाडी सरकारच्या वतीने अनेक मार्ग अवलंबले होते. याबाबत महाविकास आघाडीने अनेक बैठका घेतल्या तसेचअनेक वेळा चर्चदिखील केली. आरक्षणाबाबत ओबीसींनी केलेल्या संघर्षामुळे तसेच महाविकास आघाडीने घेतलेल्या निर्णयानुसार हे आरक्षण पूर्ववत झाले आहे, असे भुजबळ म्हणाले. बांठिया आयोगाच्या अहवालात काही ठिकाणी ओबीसींची संख्या कमी दाखविण्यात आली आहे. त्यामुळे राज्य सरकारने त्या ठिकाणी पुन्हा सर्वेक्षण करावे, अशी मागणी त्यांनी केली.

### निर्णयाचे स्वागत – राज ठाकरे

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसी समाजाला आरक्षण मिळाले ही निश्चितच आनंदाची गोष्ट आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाचे महाराष्ट्र नवनिर्माण सेना स्वागतच करीत असल्याची प्रतिक्रिया मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी दिली आहे.

### आता ताबडतोब निवडणुका जाहीर कराव्यात : जयंत पाटील

महाविकास आघाडी सरकारने ओबीसी आरक्षण टिकवण्यासाठी मोठी मेहनत घेतली होती. आरक्षणासाठी लागणारा अहवाल सादर करण्यासाठी महाविकास आघाडी सरकारने बांठिया आयोग नेमला होता. या अहवालानुसार निवडणुका घ्याव्यात, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी सांगितले. राज्य निवडणूक आयोगाने आता कोणताही विचार न करता ताबडतोब निवडणुका जाहीर कराव्यात, अशी मागणीही जयंत पाटील यांनी केली आहे.

# अहो! महागाई, रोजगारावर बोला...

## दोन महिलांनी जल्लोष करणाऱ्या भाजपच्या पदाधिकाऱ्यांना विचारला जाब

मुंबई । महाईन्यूज ।

महाराष्ट्रात ओबीसी आरक्षणानुसार निवडणुका घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने परवानगी दिली आहे आणि येत्या दोन आठवड्यात निवडणुका जाहीर करा अशा सूचनाही न्यायालयाने दिल्या आहेत. यावरून राजकीय श्रेय घेण्यास सुरुवात झाली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष प्रयत्नामुळे राजकीय ओबीसी आरक्षणाचा प्रश्न मार्गी लागला असल्याचा दावा भाजपा कार्यकर्त्यांकडून केला जात आहे.



निकालाच्या निमित्ताने पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिर येथील झाशी राणी पुतळ्याजवळ भाजपाच्या ओबीसी विभागाचे शहराध्यक्ष योगेश पिंगळे यांच्या नेतृत्वाखाली जल्लोष करण्यात आला. हा जल्लोष सुरु असतांना त्या भागातून जाणाऱ्या दोन सर्वसामान्य महिलांनी महागाई, रोजगार याबाबत आपल्या भावना व्यक्त करत भाजपाला या प्रश्नांबाबत जाब विचारला. आम्ही आजपर्यंत भाजपला मतदान करत आलो असून यापुढे भाजपला मतदान करणार नसल्याचे भाजपच्या पदाधिकाऱ्यांना त्या महिलांनी सुनावले. त्यावर उपस्थित भाजपचे पदाधिकारी निरुत्तर झाल्याचे बघायला मिळाले.

भाजपाचा जल्लोष सुरु असतांना बालगंधर्व रंगमंदिर परिसरात विद्या वाघ नावाची एक महिला तिच्या सहकारीसह तिथून जात होत्या. भाजपाचाचे कार्यकर्ते जल्लोष करत असल्याचे बघितल्यावर संबंधित महिलेने नेमके कारण विचारले. तेव्हा राजकिय ओबीसी आरक्षणाचा प्रश्न मार्गी लागल्याने जल्लोष साजरा करत असल्याचे भाजपा कार्यकर्त्यांनी सांगितले. तेव्हा या उत्तरावर विद्या वाघ या महिलेने प्रश्नांचा भडिमार केला.

"तुम्ही पेट्रोलवरील ५ रुपये आणि डिझेलवरील ३ रुपये कमी केले. पण एवढ्याने दर कमी करून काही होणार आहे का ? दुसऱ्या बाजूला हेल्मेट सक्ती केली जाते. हेल्मेट न घातल्यास दंड आकारला जातो.आम्ही हेल्मेट का घालायचे ? आता तर अन्न धान्यावरही जीएसटी आकारण्यात आला आहे, आता काय अन्न धान्य लांबूनच पाहायचे का ? त्यामुळे आम्ही कसे जगायचे,तुम्हीच सांगा, इकडे दोन रुपयांनी कमी करायचे आणि तिकडे गॅसवर २०० रुपयांनी वाढवायचे हेच आजवरच्या सरकारने केले आहे. सरकार वाढती महागाई, रोजगार यावर बोलत नाही. माझे सासरे स्वातंत्र्य सैनिक असून देखील माझ्या मुलाला आज रोजगार नाही. त्यावर देखील हे सरकार बोलण्यास तयार नाही" अशी प्रतिक्रिया संबंधित महिलेने यावर दिली. महिलांच्या या प्रश्नावर ओबीसी विभागाचे शहराध्यक्ष योगेश पिंगळे हे निरुत्तर झाल्याचे बघायला मिळाले. आजवर आम्ही भाजपला मतदान करीत आलो होतो,आता यापुढे भाजपला मतदान करणार नसल्याचेही या महिलांनी बोलून दाखवले.

## शॉर्ट न्यूज »

### रानिल विक्रमसिंघे श्रीलंकेचे नवीन राष्ट्रपती

।नवी दिल्ली। महाईन्यूज ।प्रतिनिधी।

श्रीलंकेमध्ये आज नव्या राष्ट्रपतीपदासाठी निवडणूक पार पडली आहे. या निवडणुकीत श्रीलंकेचे काळजीवाहू राष्ट्रपती रानिल विक्रमसिंघे निवडून आले आहेत. मागील ४४ वर्षात प्रथमच श्रीलंकेच्या संसदेत राष्ट्रपतीपदासाठी निवडणूक घेण्यात आली. काळजीवाहू राष्ट्रपती रानिल विक्रमसिंघे यांच्याशिवाय दुल्लस अल्हप्पारुमा आणि अनुरा कुमारा दिसानायके हे राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीच्या रिंगणात होते. २२५ सदस्य असणाऱ्या श्रीलंकेच्या संसदेत बहुमत मिळवण्यासाठी ११३ मतांची आवश्यकता होती. रानिल विक्रमसिंघे यांना स्पष्ट बहुमत मिळालं असून त्यांना १३४ मतं मिळाली आहे.

# सिद्धू मुसेवालांची 30 गोळ्या झाडून हत्या करणाऱ्या दोन आरोपींचा चकमकीत खात्मा!

## पोलिसांनी आरोपींकडून एके-47, पिस्तुल व इतर साहित्य जप्त केलं

।नवी दिल्ली । महाईन्यूज ।प्रतिनिधी।

प्रसिद्ध पंजाबी गायक सिद्धू मुसेवालाची भरदिवसा गोळ्या झाडून हत्या करणाऱ्या दोन आरोपींचा अमृतसरजवळ झालेल्या चकमकीत खात्मा करण्यात आलाय. प्रसिद्ध पंजाबी गायक सिद्धू मुसेवालांची भरदिवसा ३० गोळ्या झाडून हत्या करणाऱ्या दोन आरोपींचा अमृतसरजवळ झालेल्या चकमकीत मृत्यू झाला आहे. सिद्धू मुसेवाला हत्या प्रकरणातील दोन संशयित शार्पशूटर आणि पंजाब पोलिसांच्या तुकडीमध्ये बुधवारी (२० जुलै) दुपारी दोनच्या सुमारास अटारी सीमेजवळ चकमक झाली. या चकमकीत पंजाब पोलिसांनी



दोन्ही संशयितांचा खात्मा केला. अमृतसरजवळच्या गावात चकमक सुरू झाल्यानंतर पोलिसांनी ग्रामस्थांना घरातच थांबण्याच्या सूचना दिल्या होत्या. ही चकमक जवळपास ३ तास चालली. अटारी सीमेजवळच्या भाकना कालन गावामध्ये ही चकमक झाली. हल्लेखोर गावातील एका बंगल्यामध्ये लपल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी कारवाई केली. पोलिसांनी या बंगल्याला सर्व बाजूंनी घेरलं. ज्या ठिकाणी ही चकमक झाली, तो भाग भारत पाकिस्तान सीमेपासून जवळ असल्याने हे हल्लेखोर पाकिस्तानमध्ये पळून जाण्याची शक्यताही वर्तवण्यात आली .

### सिद्धू मुसेवालांवर 30 गोळ्या झाडल्या...

पंजाबच्या मन्सा जिल्ह्यात २९ मे २०२२ रोजी सायंकाळी जवाहरके गावात सिद्धू मुसेवाला यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. सिद्धू मुसेवाला आपल्या काळ्या रंगाच्या थार गाडीमध्ये दोन मित्रांसहीत प्रवास करत असताना हा हल्ला करण्यात आला होता. गुरविंदर सिंग आणि गुरप्रीत सिंग यांच्यासोबत जात असतानाच सिद्धू मुसेवालाच गाडी चालवत होते. घरापासून काही अंतरावर असताना अचानक सिद्धू मुसेवाला यांच्या गाडीवर अज्ञात हल्लेखोरांनी अंदाधुंद गोळीबार केला होता. सिद्धू मुसेवाला यांना चार शसस्त्र सुरक्षारक्षकांची सुरक्षा पुरवण्यात आलेली होती. या सुरक्षेमध्ये २८ मे रोजी कपात करुन पंजाबमध्ये नव्याने सत्तेत आलेल्या भगवंत मान सरकारने केवळ दोन सुरक्षारक्षक त्यांच्या सुरक्षेसाठी तैनात केले होते. सिद्धू मुसेवाला यांच्याकडे बुलेटप्रूफ फॉर्च्यूनरही होती. मात्र ज्या दिवशी हा हल्ला झाला त्या दिवशी सिद्धू मुसेवाला हे सुरक्षारक्षकांशिवाय आपल्या थार जीपने दोन मित्रांसोबत प्रवास करत होते. सिद्धू मुसेवाला यांचे वडील बलकौर सिंग यांच्या सांगण्यानुसार मुसेवालांच्या गाडीच्या मागील गाडीमध्ये दोन सुरक्षारक्षकांसहीत ते स्वत: प्रवास करत होते.

# भारतीय नागरिकत्व सोडून नागरिक 'या' देशांत होतायत स्थायिक

## 48 जणांनी पाकिस्तानला केलं जवळ

।मुंबई ।महाईन्यूज ।वृत्तसंस्था।

गेल्या 3 वर्षात 3.92 लाख भारतीय नागगरिकांनी भारताचे नागरिकत्व सोडून इतर देशांना जवळ केले आहे. विशेष म्हणजे भारतातील या नागरिकांनी आता विविध 120 देशांचे नागरिकत्व स्वीकारले आहे. यापैकी सर्वाधिक 1.70 लाख लोकांनी अमेरिकेचे नागरिकत्व स्वीकारले आहे. अशी माहिती केंद्र सरकारने मंगळवारी लोकसभेत दिली आहे.

एवढेच नाही 48 भारतीयांनी भारताचे नागरिकत्व सोडून पाकिस्तानचे नागरिकत्व जवळ केले आहे. केंद्रीय गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांनी लोकसभेत सांगितले की, परराष्ट्र मंत्रालयाकडून मिळालेल्या आकडेवारीनुसार, ज्या लोकांनी भारताचे नागरिकत्व सोडले आहे त्यांनी 120 देशांचे नागरिकत्व स्वीकारले आहे. या लोकांनी वैयक्तिक कारणांमुळे भारताचे नागरिकत्व सोडल्याचे



सांगितले जात आहे. 5 वर्षात किती लोकांनी स्वीकारले भारताचे नागरिकत्व?

गेल्या 5 वर्षात 5220 परदेशी लोकांना भारताचे नागरिकत्व स्वीकारले आहे. त्यापैकी 87 टक्के म्हणजेच 4552 पाकिस्तानातून आले आहेत. दरवर्षी सुमारे 1044 लोकांना भारताचे नागरिकत्व देण्यात आले आहे. भारतीय नागरिकत्व घेण्यात पाकिस्तान आघाडीवर आहे. पाकिस्तानातील 87 टक्के, अफगाणिस्तानच्या 8 टक्के आणि बांगलादेशातील 2 टक्के नागरिक भारताचे नागरिकत्व स्वीकारत आहे.

### तीन वर्षात 3,92,643 लोकांनी सोडले नागरिकत्व

नित्यानंद राय यांनी लेखी उत्तरात सांगितले की 2019, 2020 आणि 2021 मध्ये 3,92,643 लोकांनी भारताचे नागरिकत्व सोडले आहे. त्यापैकी 1,70,795 लोकांनी अमेरिकेचे नागरिकत्व स्वीकारले, तर 64,071 भारतील आता कॅनडाचे नागरिक बनले आहेत. याशिवाय 58,391 लोकांनी ऑस्ट्रेलियाचे नागरिकत्व घेतले आहे, 35,435 लोकांनी यूकेचे, 12131 लोकांनी इटलीचे आणि 8,882 लोकांनी न्यूझीलंडचे नागरिकत्व स्वीकारले आहे. 7,046 लोक सिंगापूर, 6,690 लोक जर्मनी, 3,754 लोक स्वीडन आणि 48 लोकांनी पाकिस्तानला जवळ केले आहे. 2021 बद्दल बोलायचे झाल्यास, गेल्या एका वर्षात 1,63,370 लोकांनी भारताचे नागरिकत्व सोडले आहे. यापैकी 78,284 भारतीयांनी अमेरिकेचे नागरिकत्व घेतले आहे, तर 23,533 लोकांनी ऑस्ट्रेलियाचे नागरिकत्व घेतले आहे.

# दीड वर्षांत सुमारे १० लाख रिक्त जागा भरणार

## सरकारच्या विविध मंत्रालयची माहिती

।नवी दिल्ली । महाईन्यूज ।प्रतिनिधी।

केंद्र सरकारने बुधवारी लोकसभेत माहिती दिली त्यानुसार १ मार्च २०२१ च्या उपलब्ध आकडेवारी नुसार केंद्र सरकार मध्ये विविध विभागांत सुमारे ९. ७९ लाख रिक्त पदे आहेत. तर एकूण स्वीकृत पदांची संख्या ४०. ३५ लाख एवढी आहे. केंद्रीय कार्मिक राज्यमंत्री जितेंद्र सिंह यांनी लोकसभेत त्यांना विचारण्यात आलेल्या प्रश्नावर विस्तृत माहिती दिली. खर्च विभागाच्या पेमेंट रिसर्च युनिटच्या अहवालानुसार मागील वर्षी मार्च पर्यंत केंद्र सरकारच्या विविध मंत्रालय आणि विभागाअंतर्गत ४०,३५,२०२ एवढी मंजूर पदे होती.

तर सद्य स्थितीत केंद्र सरकारच्या विभागांमध्ये ३०,५५,८७६ कर्मचारी आहेत अशी माहिती एक अहवालातून समोर आली आहे. "केंद्र सरकारमध्ये(central govt) वेगवेगळ्या रिक्त पदांवर भरती करण्याची जबाबदारी ही संबंधित मंत्रालय आणि विभागांची आहे. त्याचबरोबर ही एक नियमित चालविली



### केंद्रातील सर्व विभागांमध्ये ई – कार्यालय प्रणाली

**बुधवारी लोकसभेत सरकारने दिलेल्या माहितीनुसार केंद्र सरकारच्या सर्व विभागांमध्ये ई कार्यप्रणाली किंवा डिजिटल पद्धतीची कार्यलय प्रणाली सुरु करण्यात आली आहे. पर्यावरण, वन आणि जलवायू परिवर्तन मंत्रालय, न्यान विभाग, अर्थ मंत्रालय, कॉर्पोरेट कार्य मंत्रालय, प्रशासनिक सुधार आणि सार्वजनिक तक्रार विभागासह अनेक विभागांमध्ये नागरिकांना त्याचे अर्ज किंवा तक्रारी दाखल करण्यासाठी ऑनलाईन पोर्टल उपलब्ध करुन दिले आहे अशी माहिती सिंह यांनी दिली. त्याचबरोबर मंत्रालयामध्ये केंद्रीय रजिस्ट्रीचं काम सुद्धा डिजिटल स्वरूपात करण्यात आलं आहे असंही सिंह यांनी सांगितले.**

जाणारी प्रक्रिया आहे. त्याचबरोबर पंतप्रधान नरेंद्र मोदी(pm narendra modi) यांनी सुद्धा अनेक विभागांमध्ये आणि मंत्रालयांमध्ये येत्या दीड वर्षात मिशन मोड च्या अंतर्गत १० लाख कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जाईल असं सांगितलं आहे" अशी माहिती जितेंद्र सिंह यांनी दिली.

# भारतीय पुरुषांनी प्रेम दिले पण महिलांनी...; मल्लिका शेरावतने व्यक्त केली खदखद

मल्लिका शेरावत बॉलिवूडची बोल्ड अभिनेत्री म्हणून ओळखली जाते. आजकाल मल्लिका तिच्या आगामी चित्रपटांव्यतिरिक्त बोल्ड विधानांमुळेही चर्चेत आहे. एका मुलाखतीतच मल्लिका असे काही बोलून गेली की तिच्या वक्तव्याची आता जोरदार चर्चा सुरु आहे.




भारतीय पुरुषांनी तिला प्रेम दिले, परंतु महिलांनी तिला कधीही पसंत केले नाही असं विधान मल्लिकाने केलेय. एकूणच तिने बोल्ड लूकवरून होत असलेल्या टीकेवर खदखद व्यक्त केलीय. मल्लिका शेरावतने मुलाखतीत सांगितले की, चित्रपटांमधील बोल्ड सीन्सवरून तिला नेहमीच जज केले जाते. मला वाटते की, माझे ग्लॅमर त्यांच्यासाठी खूप चांगले होते. मर्डर या चित्रपटात मी बिकिनी परिधान केली होती. माझ्या आधीही अनेक अभिनेत्रींनी बिकिनी परिधान केली होती. पण मी बेफिकीर होतो. माझं फक्त एवढचं होत की, माझ्याकडे सुंदर शरीर आहे. मल्लिका पुढे म्हणाली- मी बीचवर साडी नेसून जावे अशी तुमची इच्छा आहे का?

हतिक रोशन आणि सबा काही दिवसांपूर्वी परदेशात हॉलिडे एन्जॉय करताना सुद्धा दिसले. त्याचे फोटोही सोशल मीडियावर शेअर करण्यात आले होते. हतिक आणि सबा नेमकं केव्हा लग्न करू शकतात?

# हतिक रोशनचं पुन्हा एकदा 'शुभ मंगल'? १२ वर्षांनी लहान आहे होणारी पत्नी

बॉलिवूड मधील स्टायलिश अभिनेता हतिक रोशन त्याच्या स्टाईल आणि लूक मुले नेहमीच चर्चेत असतो. हतिक रोशन गेल्या काही महिन्यांपासून अभिनेत्री सबा आझाद ला डेट करत आहे. हतिक आणि सबा गेल्या अनेक दिवसांपासून त्यांच्या त्यांच्या रिलेशनशिप बद्दल खूपच ओपन होत असल्याचं सुद्धा दिसलं. या दोघांसंदर्भात नेहमी बातम्या सुद्धा येत असतात. माध्यमांत येत असलेल्या बातम्यांमधून हतिक आणि सबा लवकरच विवाह बंधनात अडकणार असल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. हतिक रोशन आणि सबा काही दिवसांपूर्वी परदेशात हॉलिडे एन्जॉय करताना सुद्धा दिसले.



त्याचे फोटोही सोशल मीडियावर शेअर करण्यात आले होते. हतिक आणि सबा नेमकं केव्हा लग्न करू शकतात? अभिनेता हतिक रोशन आणि अभिनेत्री सबा आझाद हे दोघंही विविह बंधनात अडकणार असल्याची अद्याप कोणतीच अधिकृत माहिती समोर आलेली नाही. पण माध्यमांमधून जी माहिती समोर येत आहे त्यात असं म्हटलं आहे, की हतिक आणि सबा लवकरच सात फेरे घेणार आहेत. फिल्म फेअरने नुकतीच एक पोस्ट शेअर केली त्यात हतिक लवकरच सबा सोबत लग्न करू शकतो. असं लिहिलं आहे. मीडियामध्ये मात्र ही अफवा वेगाने पसरत आहे. याच संदर्भात ऍस्ट्रॉलॉजर बेजान दारुवाला याने हतिक आणि सबा यांचं लग्न होण्याहची शक्यता वर्तवली होती. हतिक आणि सबा यांच्या रिलेशनशिप बद्दल नेहमीच काही न काही बातम्या समोर येत होत्या. पण हतिक आणि सबा पहिल्यांदा मुंबईतील एक रेस्टॉरंट मधून बाहेर पडताना स्पॉट झाले होते आणि तेव्हा पासूनच ते दोघं कमेकांना डेट करत असल्याच्या बातम्या माध्यमांत जोर धरत होत्या.




# मनी लाँड्रिंगप्रकरणी चित्रपट निर्माती प्रेरणा अरोरा अडचणीत

बॉलिवूड चित्रपट निर्माती प्रेरणा अरोरा चांगलीच अडचणीत सापडली आहे. ईडीने तिच्याविरोधात मनी लाँड्रिंगचा गुन्हा दाखल केला आहे. 31 कोटी रुपयांच्या फसवणुकी प्रकरणी हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रेरणा अरोराविरोधात ईडीने समन्स जारी केला होता. मात्र प्रेरणा ईडीसमोर हजर झाली नाही. तिच्या वतीने वकील विवेक वासवानी हे ईडी कार्यालयात पोहचत वेळ मागून घेतला. यावेळी वकील वासवावी यांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रेरणा कामानिमित्त मुंबईबाहेर असल्याने ती चौकशीला हजर राहू शकत नाही, त्यामुळे ईडीने तिला वेळ वाढवून द्यावा. अनेक फायनान्सरचे पैसे परत न करत आर्थिक फसवणूक केल्याचा आरोप प्रेरणा अरोराविरोधात करण्यात आला आहे. दरम्यान वासु भगनानी प्रोडक्शन कंपनीने देखील प्रेरणाविरोधात नोटीस जारी केली, ज्यात वासु भगनानी यांनी प्रेरणासह तिची आई आणि क्रिआर्ज एंटरटेनमेंटच्या भागीदाराविरोधात तक्रार दाखल केली, ज्यात भगनानींनी प्रेरणाला 31.6 कोटी रुपये त्वरित परत करण्याची मागणी केली आहे.

# राणादा-पाठकबाईंकडून चाहत्यांना सरप्राईज

"तुझ्यात जीव रंगला" या मालिकेतून महाराष्ट्राच्या घराघरांत पोहोचलेले राणादा आणि पाठक बाई अर्थात हार्दिक जोशी आणि अक्षया देवधर ही जोडी आता पहिल्यांदाच चित्रपटात एकत्र दिसणार आहे. 'फाईल नंबर – ४९८ अ" या चित्रपटात हे दोघं महत्त्वाच्या भूमिकांत दिसणार आहेत. आरती श्रीधर तावरे यांची निर्मिती असलेल्या आणि मनीष हर्षा मुव्हीज प्रस्तुत मल्हार गणेश दिग्दर्शित "फाईल नंबर ४९८ अ" या चित्रपटाची कथा श्रीधर तावरे यांनी लिहिली आहे. तर श्रीधर तावरे आणि आशिष निनगुरकर यांनी पटकथा लिहिली आहे. संवाद आणि गीतलेखन आशिष निनगुरकर यांचं आहे. स्वप्नील- प्रफुल्ल यांनी संगीत दिग्दर्शनाची जबाबदारी निभावली आहे. कायद्यातील ४९८ अ या कलमाअंतर्गत एक तरुण कसा अडकतो याची गोष्ट या चित्रपटात मांडण्यात आली आहे. अलीकडेच या चित्रपटाचं पोस्टर लाँच करण्यात आलं होतं.



हार्दिक जोशी आणि अक्षया देवधर या जोडीवर महाराष्ट्रानं भरभरून प्रेम केलं आहे. या मालिकेनंतर आता त्यांचा नवा प्रवास सुरू झाला आहे. त्यामुळे ही जोडी पुन्हा कधी एकत्र दिसणार याकडे त्यांच्या चाहत्यांचं लक्ष लागलं होतं.

# अनन्या चित्रपटासंदर्भात प्राजक्ताची खास पोस्ट

मराठी मालिकांमध्ये स्वतःच्या अभिनयाची छाप पाडत अभिनेत्री हृता दुर्गुळे आता चित्रपटांमधून प्रेक्षकांना भेटण्यासाठी सज्ज झाली आहे. प्रताप फड यांचं दिग्दर्शन असलेला अनन्या हा चित्रपट २२ जुलै रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. अनन्याचा हाच प्रेरणादायी प्रवास चित्रपटाच्या माध्यमातून प्रेकक्षकांना पाहायला मिळणार आहे. अनन्याचा हाच प्रवास पाहण्यासाठी प्रेक्षक सुद्धा उत्सुक आहेत. अनन्या चित्रपटाची टीम सध्या चित्रपटाच्या प्रमोशन मध्ये व्यस्त आहे. अशातच अनन्या चित्रपटाचा खास शो सुद्धा आयोजित करण्यात आला होता.



या शो साठी मराठी कलाकारांनी हजेरी लावली होती. सर्वांनीच या चित्रपटाचं खूप कौतुक केलं. नुकतंच अभिनेत्री आणि निवेदिका प्राजक्ता माळी हिने सुद्धा अनन्या चित्रपटाचं कौतुक करत एक खास पोस्ट शेअर केली.

## शॉर्ट न्यूज »

### मैराज खानला सुवर्णपदक

नवी दिल्ली।। महाईन्यूज

भारताचा अनुभवी नेमबाज मैराज खानने आयएसएसएफ विश्वचषक नेमबाजी स्पर्धेत पुरूषांच्या स्कीट प्रकारात पहिलं सुवर्णपदक मिळवलं आहे. ही स्पर्धा चांगवान येथे पार पडत आहे. ४० फेऱ्यांच्या अंतिम फेरीत ४६ वर्षीय उत्तर प्रदेशच्या मैराजने ३७ गुणांसह अग्रस्थान पटकावले आहे. कोरियाच्या मिन्सू किम ३६ गुण आणि ब्रिटनच्या बेन लेवेलिन २६ गुण यांनी अनुक्रमे रौप्य आणि कांस्यपदकाची कमाई केली. दोन ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवलेला मैराज खान सध्या सुरू असलेल्या विश्वचषकात भारताचा सर्वात वरिष्ठ खेळाडू आहे. मैराजने जिओ येथे २०१६ मध्ये झालेल्या विश्वचषक स्पर्धेत रौप्यपदक मिळवले होते. अंजुम मुदगिल, आशी चौक्सी आणि सिष्ट कौर सामरा या भारतीय त्रिकुटाने महिलांच्या ५० मीटर रायफल थ्री पोझिशन्स सांघिक गटात कांस्यपदक पटकावले. उत्तर प्रदेशात जन्म झालेला मैराज खान हा भारताचा अनुभवी नेमबाज आहे. मैराजने आतापर्यंत दोन ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केलेलं आहे.

# भारतीय क्रिकेट संघाचा झिम्बाब्वे दौरा निश्चित!

## कर्णधारपदी लोकश राहुल?

।नवी दिल्ली। महाईन्यूज ।

भारतीय क्रिकेट संघाचा झिम्बाब्वे दौरा निश्चित झाला आहे. पुढील महिन्यात हा दौरा होणार असून कर्णधारपदाची धुरा लोकश राहुलकडे सोपविण्यात येण्याची शक्यता आहे. सध्याच्या वेस्ट इंडिजच्या दौऱ्यानंतर झिम्बाब्वे दौरा होणार असल्याचे बीसीसीआयने जाहीर केले आहे.

भारतीय संघाने आताच इंग्लंडदौरा केला. या दौऱ्यात एक कसोटी सामना, ३ टी-ट्रेन्टी मालिका आणि ३ एकदिवसीय सामने झाले. सध्या भारतीय संघ वेस्ट इंडिजच्या दौऱ्यावर आहे. वेस्ट इंडिजबरोबर भारतीय संघ तीन एकदिवसीय सामने, पाच टी-ट्रेंटी सामन्यांची मालिका खेळणार आहे. यापैकी पहिला एकदिवसीय सामना येत्या शुक्रवारी (२२ जुलै) होईल. तर, २९ जुलै ते ७ ऑगस्ट या कालावधीत टी-ट्रेंन्टीचे पाच सामने खेळवण्यात येणार आहेत. विशेष म्हणजे, यातील दोन सामने अमेरिकेत खेळविण्यात येणार आहेत.



**भारतीय संघ वेस्ट इंडिजच्या दौऱ्यावर आहे. वेस्ट इंडिजबरोबर भारतीय संघ तीन एकदिवसीय सामने, पाच टी-ट्रेंटी सामन्यांची मालिका खेळणार आहे. यापैकी पहिला एकदिवसीय सामना येत्या शुक्रवारी (२२ जुलै) होईल. तर, २९ जुलै ते ७ ऑगस्ट या कालावधीत टी-ट्रेंन्टीचे पाच सामने खेळवण्यात येणार आहेत. विशेष म्हणजे, यातील दोन सामने अमेरिकेत खेळविण्यात येणार आहेत.**

या दौऱ्यानंतर भारतीय संघ झिम्बाब्वेच्या दौऱ्यासाठी रवाना होणार आहे. तिथे उभय संघांदरम्यान तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळवण्यात येणार आहे. यातील पहिला सामना १८ ऑगस्टला, दुसरा सामना २० ऑगस्टला तर, तिसरा सामना २२ ऑगस्टला होणार आहे. या मालिकेसाठी रोहित शर्मा, जसप्रीत बुमरा आणि शिखर धवन यांना विश्रांती देण्यात येईल आणि त्यामुळ कर्णधारपदाची जबाबदारी लोकेश राहुलकडे सोपविण्यात येण्याची शक्यता आहे. क्रिकेटच्या क्रमवारीत झिम्बाब्वे १३पैकी १२व्या स्थानी आहे. १५ सामन्यांमध्ये या संघाने केवळ तीन विजय नोंदवले आहेत. आता तब्बल सहा वर्षांनी भारतीय संघ झिम्बाब्वेच्या दौऱ्यावर जाणार आहे. यापूर्वी २०१६ साली महेंद्रसिंह धोनीच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ झिम्बाब्वेच्या दौऱ्यावर गेला होता. त्यावेळी भारतीय संघ तीन वनडे आणि तीन ट्रेन्टी-२० सामन्यांची मालिका खेळला होता.

# अब्दुल्ला शफीकची शतकी खेळी

## पाकिस्तानचा श्रीलंकेवर ऐतिहासिक विजय

।नवी दिल्ली ।महाईन्यूज।



श्रीलंका आणि पाकिस्तान यांच्या सुरू असलेल्या दोन सामन्यांच्या मलिकेमध्ये पाकिस्तानच्या संघाने इतिहास रचला आहे. श्रीलंकेने ३४२ धावांचे लक्ष्य पाकिस्तानला दिले होते. हे लक्ष्य ४ गडी राखून यशस्वीपणे गाठले. पाकिस्तानच्या या विजयात युवा फलंदाज अब्दुल्ला शफीक याची खेळी महत्वाची ठरली. अब्दुल्ला शफीकने १६० धावांची नाबाद खेळी केली. यासह पाकिस्तानने दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.

श्रीलंकेने दिलेल्या ३४२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानची चांगली सुरुवात झाली. अब्दुल्ला शफीक आणि इमाम-उल-हक या जोडीने पहिल्या विकेटसाठी ८७ धावांची भागीदारी केली. मात्र, १०४ धावांच्या स्कोअरवर अझहर अली बाद झाला. अझहर अलीच्या विकेटनंतर श्रीलंकेने सामन्यात पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला. मात्र बाबर आझम आणि अब्दुल्ला शफीक यांनी आघाडी घेतली.

अब्दुल्ला शफीकने तुफान फलंदाजी करत कसोटी कारकिर्दीतील दुसरे शतक झळकावले. बाबर आझमनेही ५५ धावांची खेळी केली. या दोघांच्या खेळीमुळे पाकिस्तानला सामना जिंकण्याच्या मार्ग मोकळा झाला. अब्दुल्ला शफीकने १६० धावांची नाबाद खेळी खेळली. बाबर बाद झाल्यानंतर रिझवानने शफीकने पाकिस्तानच्या संघाचा डाव सावरला. रिझवानने ४० धावांची खेळी करत पाकिस्तानला ६ विकेटने विजय मिळवून दिला. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना श्रीलंकेने पहिल्या डावात २२२ धावा केल्या होत्या. पाकिस्तानच्या फलंदाजांनाही पहिल्या डावात चांगली कामगिरी करता आली नाही. त्यामुळे संपूर्ण संघ २१८ धावा करून सर्वबाद झाला. श्रीलंकेने मात्र दुसऱ्या डावात चांगली कामगिरी करत पाकिस्तानसमोर ३४२ धावांचे अवघड आव्हान ठेवले होते.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही